## आरोग्य विभाग जिल्हा परिषद रत्नागिरी जाहिरात

**आरोग्य विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी अतंर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रातील तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकिय अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याबाबत .**

मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या निवड समितीद्वारे आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळांतर्गत असलेल्या रत्नागिरी जिल्हयातील प्रा.आ.केंद्र महाराष्ट्र वैद्यकिय आरोग्य सेवा (गट - अ) यांची रिक्त पदे व संभाव्य रिक्त होणा-या पदासांठी व प्रतिक्षा यादीकरिता कंत्राटी (तदर्थ )वैद्यकिय अधिकारी म्हणून फक्त 11 महिन्यांचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदस्थापनेची ठिकाणे | पात्रता | मासिक एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | तदर्थ वैद्यकीय अधिकारी | प्राथमिक आरोग्य केंद्र | MBBS/BAMS | MBBS ७५०००/-<br>BAMS ४००००/- |

1. सदर पदे ही मुळची एम. बी. बी.एस. पात्रतेची असून अंतीम वर्षाच्या गुणक्रमानुसार मुलाखतीस बोलविणेत येईल. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती 11 महिन्यांसाठी किंवा सदर पदावर एम.बी.बी.एस./बी.ए.एम.एस अर्हताधारक नियमित/बंधपत्रित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आगोदर घडेल तोपर्यंत राहील.
2. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकिय अधिकाऱ्यासारखे म.ना.से. (रजा) नियम लागू राहणार नाही तसेच ते विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतीही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाही. तसेच त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाहीत.
3. सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांना धारणाधिकार असणार नाही. सदर पदावर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना कायम करणेबाबत मा. न्यायलयात जाता येणार नाही.
4. कंत्राटी तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहित मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडून दिली जाणार नाही.
5. केवळ तात्पुरती कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही
6. निवड झालेल्या कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना मुख्यालयात राहणे बंधनकारक आहे. तसेच त्यांनी बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य आहे.
7. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांनी सेवेत असताना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्यास निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.
8. सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना सेवाकाळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे पूर्ण मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.
9. शासन निर्णय क्र. मबैअ/2020/प्र.क. 152/सेवा-3/ दि.29 मे 2020 मध्ये नमूद केल्याप्रमाणे एम.बी.बी.एस पात्रताधारकांना रु. 75,000/- व शासन परिपत्रक क्रमांक मवैज-1054/ प्र.क्र.241/भाग-2/सेवा-3 दि.04 जुलै 2019 मध्ये नमुद केलेप्रमाणे बी.ए.एम.एस पात्रताधारकांना र.रु. 40000/- इतके एकत्रित मानधन दिले जाईल.तसेच शासन निर्णयात उर्वरित नमूद अटी व शर्ती बंधनकारक राहतील. वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु. 100/- चे स्टॅम्पपेपरवर करारनामा करण्यात येईल.

10 शासन निर्णय क्र. मवैश-1054/प्र.क241/भाग-2/सेवा-3दि.04 जुलै 2019 चे शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत (प्राथमिक आरोग्य केंद्र) महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा, (गट अ) या संवर्गातील रिक्त पदे नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस. व बी.ए.एम.एस. अर्हताधारकांमधून प्राधान्याने भरण्यात येतील व भविष्यात रिक्त होणा-या पदांकरिता प्रतिक्षा यादी तयार करुन त्याप्रमाणे भरणेत येईल उमेदवारांनी मुलाखतीस येताना सोबत एम.बी.बी.एस. व बी.ए.एम.एस.या शैक्षणिक अर्हतामधील सर्व वर्षांचे गुणपत्रिका, पदविका पदवी प्रमाणपत्र, महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र, अलिकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकित प्रतीचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इत्यादी सोबत घेऊन येणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र अर्ज करतेवेळी सादर करणे अनिवार्य आहे सदर प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराला अर्ज करता येणार नाही. तसेच अर्ज करणा-या उमेदवारांचे वय 58 वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच अनाधिकृत गैरहजर असलेल्या/संपामध्ये सहभागी असलेले/शासन सेवेत शिस्तभंग कार्यवाहीकरीता काढून टाकलेले वैद्यकिय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही. सदर भरतीबाबतचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखून ठेवणेत आलेले आहेत.

सही/-
(डॉ.अनिरुध्द आठल्ये)
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,रत्नागिरी
तथा सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती रत्नागिरी

सही/-
(वैदेही रानडे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी
तथा सदस्य
जिल्हा निवड समिती रत्नागिरी

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग,**

**जिल्हास्तरीय निवड समिती , द्वारा जिल्हा आरोग्य अधिकारी , जिल्हा परिषद रत्नागिरी**

**अर्जाचा नमुना**

---

**विषय- महाराष्ट्र वैद्यकिय आरोग्य सेवा गट-अ या पदावर कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करणेसाठी पात्र व इच्छुक उमेदवाराने भरावयाचा अर्ज (मूळ प्रतीत)**

1) उमेदवाराचे संपूर्ण नाव (आडनाव प्रथम):-

2) जन्मतारीख:- अर्जाच्या दिनांकास वय:-

(दिनांक) (महिना) (वर्ष)

3) शैक्षणीक अर्हता एम.बी.बी.एस.व बी.ए.एम.एस:-

4) महाराष्ट्र वैद्यकिय परिषद (एमएमसी) येथे कायम नोंदणी केल्याचा क्रं.व दिनांक:-

5) पदव्युत्तर पदवी/पदविका अर्हताधारक असल्यास विषय:-

6) संपर्क मोबाईल क्रमांक :- / ईमेल -

7) एम.बी.बी.एस.व बी.ए.एम.एस.उत्तीर्ण केलेल्या महाविद्यालयाचे नाव:-

8) एम.बी.बी.एस.व बी.ए.एम.एम. परिक्षेतील गुण खालीलप्रमाणे-

| अ.क्रं. | वर्ष | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | प्रयत्न संख्या | पैकी गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रथम वर्ष | | | | | |
| 2 | द्वितीय वर्ष | | | | | |
| 3 | तृतीय वर्ष १ | | | | | |
| 4 | तृतीय वर्ष २ | | | | | |
| 5 | अंतीम वर्षाचे गुण | | | | | |

९) सार्वजनिक आरोग्य विभागातील काम केल्याचा अनुभव असल्यास कालावधी

| अ.क्रं. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव | पद | एकूण कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

११) कायमचा पत्ता:-

१२) बंधपत्रित/अबंधपत्रित (बंधपत्रित असल्यास कॉलेजचे पत्र व परिमंडळाचे ना हरक्त पत्र जोडावे.)

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे. मी प्रमाणित करतो/ करते कि, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस पात्र व बांधील राहीन.

दिनांक:- / /2026

ठिकाण :-

उमेदवाराची स्वाक्षरी

(उमेदवाराचे संपुर्ण नांव )

**खालील प्रमाणपत्रे साक्षांकित करुन अर्जासोबत जोडलेल्या आहेत.**

१. जन्मतारखेचा दाखला/१० वी पास प्रमाणपत्र

२. एमबीबीएस उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रिका (सर्व वर्षाच्या)

३. पदव्युत्तर पदवी/पदनिनस गुणपत्रिका व प्रमाणपत्र

४. महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे कायम नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र (एमएमसी अनिवार्य)

५. आंतरवासियता प्रमाणपत्र

६. अनुभव असल्यास दाखला प्रमाणपत्र

७. अॅटेम्प्ट सर्टिफिकेट